# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी पोर्टल/(३६८०-२२)/२०२१-२२/शिष्यवृत्ती/ 1803 दिनांक : २१.०६.२०२२

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

४. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

५. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

६. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य २०२१-२२/डीबीटी/६६०८ दि. २०.०६.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू योजनांसाठी दि. १५.०६.२०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज करणेसाठी मुदत देण्यात आलेली होती.

**विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने, उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांसाठी सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरलेले आहेत, अश विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती त्रुटी पूर्तता करुन Re-Apply करणेसाठी दि. ३०.०६.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरणेसाठी दि. ३०.०६.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

**सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांना याबाबत समाज माध्यम, सूचना फलक इ. सर्व माध्यमांद्वारे कळविण्यात यावे, जेणेकरुन महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती बाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही. सदरहू माहिती न मिळाल्यामुळे जर एखादा पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याची कृपया नोंद घ्यावी.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.